ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख ५ मे, १९५४ | अंक १७

## विविध माहिती

**जपानच्या निर्यातींत वाढ**—१९५३ सालांत जपानकडून चीनला होणाऱ्या निर्यातींत १९५२ सालच्या मानानें किंमतीच्या दृष्टीनें ७ पट वाढ झाली. अमेरिकेनें निर्यातीस बंदी असणाऱ्या मालाची यादी कमी केली तर निर्यात आणखीहि वाढेल असें म्हणतात.

**भारतीय चित्रपटांचें प्रदर्शन**—मॉस्कोमध्यें भारतीय चित्रपटांचें पहिलेंच प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. रशिआला पाठविण्यासाठीं १० चित्रपट मागविण्यांत आले असून त्यांतून शेवटची निवड होणार आहे. सर्व चित्रपटांना रशिअन भाषांतील ध्वनिपट जोडण्यांत येणार आहे. 'दो बिघा जमीन' ह्या चित्रपटाला ध्वनिपट जोडण्यांत आला आहे. त्याशिवाय 'आवारा', 'झांशी की राणी', 'हम लोग' आणि 'बैजु बावरा' ह्यांचेंहि संस्करण चालू आहे.

**काश्मीरला विजेचा पुरवठा**—पंजाब सरकार आणि काश्मीर सरकार ह्यांच्यांत वीज-पुरवठ्याचा एक करार नुकताच करण्यांत आला. पंजाबमधील बुहल नदीवर असलेल्या धरणावर तयार होणाऱ्या विजेपैकी १,५०० किलोवॅट वीज जम्मू आणि काश्मीरला पुरविण्यासंबंधीं हा करार आहे.

**हातमागाच्या कापडाची निर्यात**—हातमागाच्या धंद्याला उत्तेजन देण्यासाठी ह्या प्रकारच्या कापडाची निर्यात खुल्या परवान्यानें करण्याची परवानगी भारत सरकारनें दिली आहे. ही परवानगी आणि त्यानुसार होणारी निर्यात तावडतोबीनें अंमलांत येणार आहे.

**अमेरिकेंतील शेतीच्या जीवनाचा अनुभव**—अमेरिकेंतील शेतीच्या जीवनाचा अनुभव घेण्यासाठी २५ भारतीय विद्यार्थी अमेरिकेला जाणार आहेत. हे विद्यार्थी भारतामधील १८ राज्यांतून निवडण्यांत आले असून ते प्रत्यक्ष काम करूनच शिकणार आहेत. अमेरिकन शेतकऱ्यांच्या घरांत राहून शेतीच्या आधुनिक तंत्रांची माहिती ते करून घेतील. चालू वर्षाच्या पावसाळ्यानंतर अमेरिकन शेतकऱ्यांचीं कांहीं मुलें भारतांत येणार आहेत.

**दिल्लींत पाहुण्यांसाठी सोय**—भारतीय सरकार दिल्ली येथें पाहुण्यांना राहण्यासाठी एक इमारत राखून ठेवणार आहे. राज्य-सरकारांचे मंत्री अगर सरकारी कामासाठी बोलावण्यांत आलेले सरकारी अधिकारी ह्यांची सोय ह्या इमारतींत करण्यांत येणार आहे. सध्यां कोटा हाउस ही इमारत सरकारी अधिकाऱ्यांना भाड्यानें देण्यांत आली आहे. पाहुण्यांसाठी ह्याच इमारतीचा उपयोग करण्यांत येणार आहे. इमारतींत ३० पाहुण्यांची सोय होऊं शकेल.

**दलाई लामासाठी नवा वाडा**—तिबेट कम्युनिस्ट चीननें व्यापल्यापासून तेथें आधुनिकता अधिकाधिक प्रमाणांत दिसूं लागली आहे. चिनी कम्युनिस्टांनीं दलाई लामाला रहाण्यासाठी एक नवा वाडा बांधला आहे. हा वाडा दुमजली असून तो बांधण्यासाठी चिनी लष्करी एंजिनिअर्स सहा महिने खपत होते. वाड्यासाठीं लागणारें सिमेंट, लोखंड, इत्यादि सामान भारतानें पुरविलें होतें.

**रशिआजवळ वरचढ शस्त्रास्त्रें**—अमेरिकन लष्कराजवळ असलेल्या अणुशक्तींच्या शस्त्रास्त्रांपेक्षांहि वरचढ अशीं शस्त्रास्त्रें रशिआजवळ असल्याचें पूर्व जर्मनींतील रेडिओवरून सांगण्यांत आलें. ह्या नव्या शस्त्रास्त्रांच्या साह्यानें अमेरिकन विमानतळावर हल्ला करून रशिआवरील संभाव्य हल्ला तेथेंच हाणून पाडतां येईल, असेंहि निवेदन करण्यांत आलें.

**कानपूर येथें औद्योगिक पदार्थसंग्रहालय**—कानपूरला एक औद्योगिक पदार्थसंग्रहालय स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या संग्रहालयांत निरनिराळ्या प्रकारचीं यंत्रें आणि त्यांच्यापासून धोक्याचा बचाव करण्याच्या युक्त्या दाखविण्यांत येतील. कामगारांना होणारे अपघात टाळण्यासाठी संग्रहालयाचा चांगला उपयोग होईल. अशाच पद्धतीचें एक संग्रहालय मुंबईलाहि स्थापन करण्यांत येणार असल्याची वार्ता आहे.

**अमेरिकेंतील विजेचा खप**—गेल्या नऊ वर्षांत अमेरिकेंतील विजेचा खप दुपटीपेक्षां अधिक वाढला आहे. १९५३ मध्यें अमेरिकेंत ५१,३०० कोटी किलोवॅट तास वीज निर्माण करण्यांत आली. जगांतील वीज-उत्पादनांपैकी ४२ टक्के वीज अमेरिकेंत निर्माण झाली. त्याच वर्षीं ४,००,००० नवीन गिऱ्हाइकें वीज-कंपन्यांनीं मिळविलीं. आतां अमेरिकेंतील ९८ टक्के कुटुंबें वीज वापरणारीं अशीं झालीं आहेत.

**आग्रा जिल्ह्यांत नव्या विहिरी**—उत्तर प्रदेश सरकारच्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग म्हणून आग्रा जिल्ह्यांत ७,००० नव्या विहिरी खोदण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी प्रत्येक तहसिलांत कमिट्या स्थापण्यांत आल्या असून त्या जिल्हा-नियोजनसमितीकडे प्रत्येक भागांतील गरजा काय आहेत त्या-संबंधी माहिती पाठविणार आहेत.

**के. ई. एम्. हास्पितळाला मदत**—मुंबई येथील जी. ई. एस. मेडिकल कॉलेज आणि के. ई. एम्. हॉस्पिटल ह्या संस्थांना रॉकफेलर फौंडेशनकडून ९,००० डॉलर्स किंमतीचें वैद्यकीय साहित्य मिळणार आहे. कॉलेजला मिळणारीं ५,५०० डॉलर्सची मदत औषधें तयार करण्यासाठी खर्च करण्यांत येणार आहे.

## दि. सांगली बँक लि., सांगली.

अध्यक्ष, श्री. आर. व्ही. देशमुख, बी. ए., बी. लिट्. (ऑक्स.) कलेक्टर द. सातारा, ह्यांचें

### वार्षिक सभेंतील भाषण.

गेल्या चार वर्षांचे तुलनात्मक आंकडे पहातां, आपल्या बँकेच्या प्रगतीची कल्पना होईलः—

| | ( आंकडे हजार रु. चे ) | | | |
|---|---|---|---|---|
| | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ |
| (१) रिझर्व्ह व इतर फंड | ३,३० | ३,७३ | ४,३९ | ५,३६ |
| (२) ठेवी ... | ७५,९९ | ७९,३८ | ८५,९३ | ८७,९३ |
| (३) सरकारी रोखे ... | २७,४५ | २४,०० | २८,८० | २९,९७ |
| (४) रोकड ... | १८,४९ | १८,२६ | २१,९० | १९,२८ |
| (५) कर्जे ... | ४५,३४ | ४८,१७ | ४४,८० | ४७,८६ |
| (६) निवळ नफा ... | ७३ | १,१३ | १,१२ | १,१६ |

बँक धारण करीत असलेल्या रोख्यांची दर्शनी किंमत २९,९४,६०० रु. असून त्यांची हिशेबांत दाखविलेली किंमत फक्त २,००० रु. नीं ज्यास्त आहे. बहुतेक सर्व रोखे अल्प मुदतीचे आहेत आणि मुदतीपर्यंत ते धारण केल्यानंतर बँकेस नुकसान येण्याचें कारणच नाहीं. बँकेकडील ८८,००,००० रु. च्या ठेवींपैकीं ४५,७६,७५५ रु. म्हणजे ५२% रक्कम कर्जाऊ देण्यांत आली आहे आणि ४९,२५,००० रु. रोख व सरकारी कर्जरोख्यांत गुंतवलेले आहेत. बँकेनें खर्चाच्या बाबतींत शक्य तेवढी काटकसर केलेली आहे. इतर बँकांशीं तुलना करतां, आपल्या बँकेचा ताळेबंद समाधानकारक परिस्थिति दर्शवितो, असें विश्वासपूर्वक सांगतां येईल. बँकांपुढील सर्वसामान्य अशा कांहीं प्रश्नांचें दिग्दर्शन आतां थोडक्यांत करतों.

### बँकांपुढील सर्वसामान्य कांहीं प्रश्न

सिव्हिल कोर्टांतून बँकांची थकबाकी वसूल करण्यास दीर्घावधि लागतो. त्यांनीं त्यांचीं येणीं सत्वर वसूल करण्याची कांहींतरी तरतूद कायद्यांत केली जाणें अगत्याचें आहे. हुकुमनाम्यांत कोर्टें बँकांना फारच कमी व्याजाचा दर देववितात. हप्तेहि फार दीर्घकाळच असतात. त्यामुळें तर हे व्याजाचे दर अन्यायकारक ठरतात. इमानी कर्जदाराला भारी दर आणि अप्रामाणिकाला अल्प दर, असा त्याचा परिणाम होतो. ही अनिष्ट प्रवृत्ति टाळण्यासाठी कायद्यांत सत्वर सुधारणा केली पाहिजे.

बँक आणि नोकरवर्ग ह्यांचेमधील तंट्यांबाबत कायद्यांतहि सुधारणेची आवश्यकता आहे. नोकरवर्गावरील खर्च आणखी कमी व्हावयास हवा. त्यामुळें व्यापारी वर्गाला अधिक सवलती देणें बँकांना शक्य होईल.

ग्रामीण भागांतून पोलिसांचें पुरेसें संरक्षण मिळूं शकत नसल्यामुळें, तेथें बँकिंगचा प्रसार होणें अवघड जातें. विमा उतरून धोवयाची तरतूद करणें बँकांना अतिशय महाग पडतें; लहान बँकांना तो खर्च झेपणार नाहीं. ग्रामीण विभागांतील दळणवळण सुधारून बँकिंग अधिक सुरक्षित झालें म्हणजे ग्रामीण विभागांत बँकिंगची वाढ होऊं शकेल. ट्रेझरी व सब-ट्रेझरी ह्यांनीं बँकांना नाणीं, नोटा, खराब नोटा, इत्यादींचे बाबतींत जास्त सवलती देणें जरूरीचें आहे. सरकारी ट्रेझऱ्यांनीं बँकांचें काम त्वरेनें पुरें करून विलंब टाळावा हें युक्त आहे.

सरकारच्या सध्यांच्या "डेफिसिट फायनान्स"च्या धोरणामुळें मालाच्या किंमती वाढतील अशी कित्येकांची समजूत आहे. परंतु किंमती स्थिर रहाण्याच्या प्रवृत्तीस पोषक अशाच कितीतरी बाबी आहेत. जनतेच्या हातीं नवीन येणारा पैसा नवीं कर्जें किंवा कर ह्या मार्गानें परत खेचला जाईल. कडक काटकसर आणि स्थिर किंमती ह्यांची पंचवार्षिक योजनेच्या यशास अत्यंत आवश्यकता आहे.

### सांगली बँक लि. चा संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ४,५०,००० | कॅश, बँकांत | १९,८८,३१२ |
| रिझर्व्ह, इतर फंड | ५,००,७२३ | इन्व्हेस्टमेंटस | ३१,०५,०८२ |
| ठेवी | ८७,९३,०६० | कर्जें | ४७,८६,८६२ |
| नफा | १,१६,०८९ | इमारत | ३,७३,६३५ |

## परकीय कंपन्यांतील भारतीय नौकर

१९५२ सालच्या प्रारंभीं परकीय कंपन्यांत नौकरी करणाऱ्या आणि दरमहा एक हजार अगर अधिक पगार असणाऱ्या दर चार तंत्रज्ञांपैकी अवघा एकच तंत्रज्ञ भारतीय नागरिकत्व धारण करणारा होता. त्यानंतर १८ महिन्यांनीं हें प्रमाण दर तीन तंत्रज्ञांत एक भारतीय असें झालें. १९५२ सालीं भारत सरकारच्या व्यापार आणि उद्योग खात्यानें भारी पगाराच्या अधिकाधिक जागा लायक भारतीय नोकरांना देण्यांत याव्या अशी विनंति भारतांत काम करणाऱ्या परकीय कंपन्यांना केली होती. त्या विनंतीचा कितपत उपयोग झाला तें वरील माहितीवरून दिसून येतें. बिगर-भारतीय कंपन्यांची असोशिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्या नांवाची संघटना आहे. ह्या संघटनेनें भारतीय सरकारच्या व्यापार आणि उद्योग-खात्याला पुढीलप्रमाणें माहिती कळविली आहे. चेंबर्सशीं जोडलेल्या कंपन्यांतून १ जानेवारी, १९५२ रोजीं १९,०८० भारतीय नागरिक काम करीत होते. ही संख्या १ जुलै, १९५३ पर्यंत २२,३७२ इतकी वाढली. ह्याच काळांत बिगर-भारतीय नौकरांची संख्या ७,६०९ वरून, ७,४४१ पर्यंत खाली घसरली. निरनिराळ्या प्रकारच्या नौकरवर्गाच्या संख्येंत पडलेल्या फरकाचा तपशील पुढील कोष्टकांत दिला आहे.

| | भारतीय | | बिगर-भारतीय | |
|---|---|---|---|---|
| | जाने. १९५२ | जुलै १९५३ | जाने. १९५२ | जुलै १९५३ |
| **तंत्रज्ञ** | | | | |
| ३०० ते ४९९ रु. पगार | ४,७७४ (९९·१) | ५,३२९ (९८·४) | ४१ | ८९ |
| ५०० ते ९९९ रु. पगार | ३,२०० (९०·२) | ३,८०३ (९२·२) | ३४६ | ३११ |
| १,००० अगर अधिक रुपये पगार | १,०५९ (२५·६) | १४२४ (३२·१) | १७५९ | ३००९ |
| **मॅनेजर अगर तत्सम जागा** | | | | |
| ३०० ते ४९९ रुपये पगार | ५,१२६ (९९·३) | ५,९२१ (९९·५) | ३७ | ३२ |
| ५०० ते ९९९ रुपये पगार | ३,४४३ (८५·१) | ४,०६८ (८८·३) | ६०९ | ५३८ |
| १,००० अगर अधिक रुपये पगार | १,४७८ (२९·७) | १,८२७ (३४·७) | ३,५०३ | ३,४४२ |

*कंसांतील आंकडे एकूण नौकरवर्गाशीं पडणाऱ्या भारतीय नौकरवर्गाच्या प्रमाणाचे आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ५ मे, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कापड–गिरण्यांसंबंधीं वस्तुस्थिति

भारतांतील कपास कापडाच्या गिरण्यांतून ११० कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे व त्या गिरण्यांची वार्षिक उलाढाल ३५० ते ४०० कोटी रुपयांची आहे. हिंदी ४५७ गिरण्यांतून ७,६४,५०० कामगारांना काम मिळत आहे. शेतीचे खालोखाल, पोटपाण्यास देणारा हाच महत्त्वाचा धंदा आहे. एकट्या मुंबईमधील गिरण्यांचीच मजुरीची वार्षिक रक्कम २७ कोटी रुपये होते. कपास पेरणारा शेतकरी, हातमागावर विणणारा विणकर, इत्यादींनाहि ह्या धंद्याचा मोठा आधार आहे.

भारत व इतर कांहीं प्रमुख देश ह्यांतील गिरण्यांतील चात्या व माग ह्यांचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहे.

| देश | चालू चात्या (लक्ष) | चालू माग (हजार) |
|---|---|---|
| ग्रटब्रिटन | २४१ | २५९ |
| जपान | ५९ | २७५ |
| यू. एस..ए. | २२१ | ३२९ |
| जर्मनी | उपलब्ध नाहीं | १२० |
| इटली | ४८ | १०१ |
| भारत | १०२ | १८९ |

बसविलेले माग व चात्या ह्यांची भारतांतील वाटणी खालील-प्रमाणें आहेः—

| ठिकाण | गिरण्यांची संख्या | चात्या | माग |
|---|---|---|---|
| मुंबई शहर व बेट | ६५ | ३०,१७,०४९ | ६५,६२८ |
| अहमदाबाद | ७४ | २०,५५,७१० | ४२,५७८ |
| सौराष्ट्र | ११ | १,६७,६६० | ३,६३९ |
| बाकीचें मुंबई राज्य | ६१ | १२,६६,५४० | २४,२४८ |
| राजस्थान,अजमीर,पेप्सु | १२ | १,६९,४९४ | ३,८७७ |
| पूर्व पंजाब, दिल्ली | ११ | २,१३,२३२ | ५,१३२ |
| उत्तर प्रदेश | २९ | ८,११,४२८ | १३,२३१ |
| मध्यप्रदेश | ११ | ३,६७,८२२ | ७,२६५ |
| मध्यभारत, भोपाळ | १८ | ४,४५,४६२ | ११,३८३ |
| बिहार, ओरिसा | ३ | ७६,६६० | १,६११ |
| प. बंगाल | ३८ | ५,०५,९४४ | १०,४२७ |
| हैद्राबाद | ७ | १,५०,७०४ | ३,२४४ |
| मद्रास | ९३ | २०,३४,८६४ | ९,१९५ |
| त्रावणकोर–कोचीन | १० | १,३३,५६८ | ७१६ |
| म्हैसूर | ११ | २,२३,१९० | ३,०८४ |
| पाँडिचेरी | ३ | ८१,८१२ | १,९९२ |
| एकूण | ४५७ | १,१७,२१,१३९ | २,०७,२५० |

१९५२ मध्यें गिरण्यांनीं १४४ कोटी पौंड सूत निर्माण केलें. त्यापैकीं कापड करण्यासाठीं गिरण्यांनीं ९५ कोटी पौंड सूत वापरलें. २ कोटी पौंड सूत निर्गत झालें व ४७ कोटी पौंड सूत हातमाग व इतर गिऱ्हाइक ह्यांस मिळालें.

१९५२ मधील गिरणींतील कापडाचें उत्पादन ४५९ कोटी वार भरलें. ६० लक्ष वार कापडाची आयात झाली, तर ५९ कोटी वार कापड निर्गत झालें. हिंदी नागरिकांना ४०१ कोटी वार कापड वापरण्यासाठी उपलब्ध झालें.

१९५२ मध्यें हिंदी गिरण्यांनीं एकूण ४२ लक्ष, ५९ हजार गाठी कपास (१ गाठ = ३९२ पौंड) कापड करण्यासाठी वापरली. त्यांपैकी ३२ लक्ष, ३४ हजार गाठी हिंदी कपाशीच्या होत्या व १० लक्ष, २५ हजार गाठी विदेशी कपाशीच्या होत्या. कपाशीच्या बाबतींत भारत स्वयंपूर्ण होणें अत्यंत जरूरीचें आहे. कपाशीसाठी बाहेर पैसे जाणें व परदेशीय कपाशीच्या बाजारपेठांवर विसंबून रहाणें, ह्या दोन्ही गोष्टी अनिष्ट अशाच आहेत. १९५५–५६ च्या मोसमांत हिंदी कपाशीचें उत्पादन ४२ लक्ष, २९ हजार गाठींपर्यंत पोंचेल अशी पंचवार्षिक योजनेची अपेक्षा आहे. धरणें बांधलीं गेल्यावर पाणीपुरवठा वाढेल आणि कपाशीचें उत्पादन सुधारेल अशी अपेक्षा आहे. १९५३–५४ चेंच कपाशीचें पीक ४० लक्ष गाठी होईल अशी अपेक्षा आहे.

उत्पादन खर्चाचे मुख्य वाटेकरी म्हणजे कपास, मजुरी, जळण, वीज, मिल स्टोर्स व व्यवस्थाखर्च हे होत. कपाशीची उमरा जात १९३८–३९ मध्यें १४६ रु. स खंडी ह्या दरानें मिळत असे; १९५१–५२ मध्यें तिची किंमत ८३० रु. झाली. भडोचची किंमत १५७ रु. वरून ९०० रु. वर गेली. विदेशी कपास युद्धापूर्वीच्या मानानें पांचपट महाग आहे आणि तिचेवर पौंडामागें २ आणे आयात कर आहे.

मुंबई शहरांतील गिरणीकामगारांस युद्धापूर्वी ३२ रु. ८ आ. मासिक मजुरी मिळत असे, आतां ती १३२ रु. ८ आ. एवढी झाली आहे. कोळशाची किंमत टनामागें १५ ते २२ रु. होती ती आतां ५५ रु. आहे. मुंबई सरकारनें विजेच्या वापरावर युनिटला १·५ पै अशी पट्टी बसविली आहे, तिचा बोजा ३८ लक्ष रु. होतो. प्रोसेस स्टीम तयार करण्यासाठी कित्येक गिरण्या फरनेस ऑईल वापरतात. त्याचीहि किंमत २९ रु. टनावरून १४६ रु. टन झाली आहे. मिलस्टोर्सची किंमत चौपट झाली आहे. उत्पादनखर्चाची वाढ खालील तक्त्यांत एकत्रित दिली आहे:—

१९३९=१००

| | |
|---|---|
| कपास | ५७१ |
| मजुरी | ४०८ |
| कोळसा | ३४१ |
| फरनेस तेल | ५३३ |
| स्टोर्स | ४०० |

उत्पादनावरील करांच्या बोजाचा विचार केला, तर १९४८ ते १९५२ ह्या पांच वर्षांच्या सरासरीप्रमाणें दरसाल ५·४२

कोटी रुपये एवढी आयात जकात परदेशी कपाशीवर वसूल करण्यांत आली. एकट्या मुंबई शहरांतील गिरण्यांनीं ४२ लक्ष रुपये एवढा विक्रीकर कपाशीच्या खरेदीवर भरला.

मिल स्टोर्सवरील आयातजकातीचे स्वतंत्र आकडे उपलब्ध नाहींत. स्टोर्स वगैरेच्या खरेदीवरील विक्रीकराची रक्कम एकट्या मुंबईत २० लक्ष रु. होत असली पाहिजे. मुंबईमधील गिरण्या १९३९ मध्यें म्युनिसिपल कर व मालमत्ता कर मिळून २७ लक्ष रुपये देत होत्या; १९५१ मधील तत्सम रक्कम ६२ लक्ष रु. होती. कापडाच्या विक्रीवरील करापासून सर्व राज्यसरकारांना ११ कोटी रुपये मिळत असावेत असा अंदाज आहे. भारत सरकारला एक्साइज ड्यूटीचे २० कोटी रुपये सालिना मिळतील.

कच्चा माल, मजुरी, जळण, वीज, स्टोर्स, ह्या सर्वांवरील खर्च तीन ते पांचपट झाला आहे आणि उत्पादन व वापर ह्यांवरील करांची रक्कम ४० कोटी रुपयांवर गेली आहे. ह्या सर्वांचा परिणाम कापडाची किंमत वाढण्यांत झाला आहे.

गिरण्यांचें उत्पन्न खालीलप्रमाणें खर्च होतें:—

| | % |
|---|---|
| कपास | ५२·०१ |
| मजुरी | २४·३६ |
| उत्पादन–खर्च | १४·५६ |
| घसारा | २·२२ |
| कर | १·१९ |
| रिझर्व्ह | १·१७ |
| मॅ. एजंटांचें कमिशन | ०·९२ |
| डिव्हिडंड | २·१९ |

### जगांतील जळणाचा सांठा घटत आहे

आधुनिक यंत्रयुगांत औद्योगिक जळणाचें महत्त्व किती आहे तें सांगण्याची गरज नाहीं. कारखान्यांना, बोटींना, पंपिंग स्टेशन्सना रोज कोट्यवधी गॅलन जळणाच्या तेलाची आवश्यकता असते. पण ह्या तेलाचा सांठा कायमचा पुरण्यासारखा आहे का, असा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. पुढें येणाऱ्या पिढ्यांना ह्या जळणाचा पुरेसा पुरवठा व्हावयाचा असेल तर नवीन जळणाचे सांठे शोधून काढण्याचे प्रयत्न आतांपासून करणें जरूर आहे. पी. एस्. पुटनॅम नांवाच्या अमेरिकन संशोधकानें आणि यंत्रज्ञानें 'एनर्जी इन् दि फ्यूचर' ह्या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें असून त्यांत वरील निष्कर्ष काढण्यांत आला आहे. अमेरिकेच्या ॲटॉमिक एनर्जी कमिशननें मि. पुटनॅम ह्यांच्याकडे कांहीं खास कामगिरी सोंपविली आहे. ही कामगिरी करीत असतांना त्यांना जो अभ्यास करावा लागला त्यावर वरील निष्कर्ष आधारलेला असल्यामुळें त्याला विशेष अर्थ प्राप्त झाला आहे. पुढील ५० ते १०० वर्षांत जगाला जास्तींत जास्त किती औद्योगिक शक्ति लागेल ह्याविषयींचा आढावा घेण्याचें काम त्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें होतें. हें काम करतांना त्यांनीं जी माहिती गोळा केली आहे तीवरून असें दिसतें कीं, सध्यां जगाचा जो भाग जेमतेम जीव धरून राहिला आहे, त्या भागांत जर औद्योगीकरण होऊं लागलें तर सध्यांच्या औद्योगिक जळणाच्या सांठ्यावर फार मोठा ताण पडेल आणि चालू शतकाच्या अखेरीस अशी परिस्थिति निर्माण होईल कीं, कोळसा अगर तेल ह्या सारख्या जळणाच्या पदार्थांचा सांठा फक्त आणखी १०० वर्षे पुरेल इतकाच शिल्लक राहील. अमेरिकेंत आणि इतर पुढारलेल्या देशांतून अणुशक्तीचा जळणासाठीं उपयोग करण्याचे प्रयत्न कां करण्यांत येत आहेत, हें वरील माहितीवरून चांगलें लक्षांत येईल.

## काव्यमय पत्रानें करभार हलका झाला ?

### सुपारीवरील कराबाबत संस्कृत कवितेंत पत्रें

श्री. सूर्यनारायण व्यास, संपादक, "विक्रम", उज्जयिनी, ह्यांनीं अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांना सुपारीवरील कर कमी करण्याची विनंति संस्कृतमध्यें पद्यमय पत्र पाठवून केली. त्यास अर्थमंत्र्यांनीं संस्कृत काव्यांतच उत्तर पाठविलें. अंदाजपत्रकावरील चर्चेचे वेळीं उपसभापति, श्री. अनंतशयनम् अय्यंगार, ह्यांच्या सूचनेवरून हीं दोन्हीं पत्रें श्री. देशमुख ह्यांनीं वाचून दाखविलीं. हीं पत्रें खालीं दिलीं आहेत:—

#### श्री. व्यास ह्यांचें पत्र

श्रमिणां दुर्बलानां च क्षणसंतोषदायकम् ।
मध्यवित्तजनानां च स्वागतार्थं सहायकम् ॥
निर्धनानां च नारीणां एकमेवाश्रयं महत् ।
पूगीफलं न चैवान्यत् फलं जगति विद्यते ॥
नाधुना क्रयशक्तिश्च कठिनं जनजीवितम् ।
पूगीफलप्रसादोऽपि महर्घो दुर्लभोऽभवत् ॥
कृपया करुणां कृत्वा, मुक्तं पूगीफलं कुरु ।
वित्ताधिप महाभाग इति संप्रार्थयाम्यहम् ॥

" श्रम करणारे, दुर्बल, मध्यम स्थितींतील लोक, दरिद्री लोक, स्त्रिया, या सर्वांना क्षणभर सुख देणारें, एकमेकांच्या स्वागत-समारंभाला साहाय्यभूत होणारें, असें एकच फळ आहे, तें म्हणजे पूगीफल (सुपारी) होय. आज लोकांची क्रयशक्ति कमी झालेली आहे व एकंदर जीवन कठीण झालें आहे. सुपारीचा प्रसाद् देखील दुर्लभ झाला आहे म्हणून, अर्थमंत्रीमहाशय, कृपा करून तुमच्या कराच्या । काचणींतून सुपारीला मुक्त करा, अशी प्रार्थना करितों."

#### श्री. देशमुख यांचें उत्तर

अभ्यर्थनाया भवता व्यधायि ।
पूगीफला याति करप्रसंगे ॥
न हन्ततां पूरयितुं क्षमोऽस्मि ।
क्षमस्व मोघानुनयोऽपि सूरे ॥ १ ॥
यद्यावकाश द्रविणेश्वरेभ्यः
विकासकार्याय कराभिलाषः ।
दरिद्रनारायणतोऽपि देशे
करावलब्धोऽपरिहार्यकल्पः ॥ २ ॥

"हे कवे, सुपारीच्या आयातीवरील कराच्या बाबतींत तुम्हीं जी विनंति केली आहे ती मान्य करतां येत नाहीं याबद्दल मला क्षमा करा. देशाच्या विकासकार्यासाठीं कर जमविण्याची इच्छा धरून धनिक लोकांपासून शक्य तितका कर जर आम्हीं घेत आहोंत, तर त्याच हेतूनें दरिद्रीनारायणापासूनहि थोडासा कर घेणें अपरिहार्य आहे!"

### वापरांत असलेले रेडिओ

१९५३ मध्यें सबंद जगांत एकूण २३,००,००,००० रेडिओ वापरांत होते. त्यापैकीं उत्तर अमेरिकेंत १२ कोटी, युरोपांत ७ कोटी, आशियांत १·६ कोटी, दक्षिण अमेरिकेंत ५० लक्ष, ऑस्ट्रेलियांत ३० लक्ष व आफ्रिकेंत २० लक्ष होते. उत्तर अमेरिकेंत प्रत्येक १,००० नागरिकांस ५२० रेडिओ असें प्रमाण पडलें. आशियांत तें १२ व आफ्रिकेंत १० पडलें. अमेरिकेंत ११ कोटी रेडिओ चालू होते, त्यापैकीं २·५ कोटी मोटारींत बसविलेले होते.

## इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनचे कामकाजांत सुधारणा

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनला विनावेतन काम करणाऱ्या अध्यक्षाऐवजीं संपूर्ण वेळ काम करणारा पगारी अध्यक्ष असावा ही इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन चौकशी समितीनें केलेली शिफारस भारत सरकारनें तत्त्वतः स्वीकारली आहे. यामुळें इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन ॲक्टांत बदल करावा लागेल आणि म्हणून संसदेच्या पुढील अधिवेशनांत तसें करण्याबाबत एक विधेयक येण्याची अपेक्षा आहे.

या कायद्यानुसार कॉर्पोरेशनला मिळालेल्या अधिकारांची अंमलबजावणी करण्याबाबतहि सरकारनें कॉर्पोरेशनला कांहीं सूचना केल्या आहेत. इं. फा. का. चौकशी समितीनें केलेल्या शिफारशींवर घेतलेल्या निर्णयानुसार केलेल्या या सूचना पुढीलप्रमाणें आहेत:—

(१) देशांतील निरनिराळ्या औद्योगिक हितसंबंधियांस कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांस प्रत्यक्ष भेटण्याची संधि मिळावी म्हणून कॉर्पोरेशनच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांची दिल्लीशिवाय मुंबई, कलकत्ता, मद्रास, यांसारख्या महत्त्वाच्या शहरीं मधूनमधून बैठक व्हावी.

(२) कर्जासाठीं कॉर्पोरेशनकडे आलेल्या अर्जांत आपले कोणते हितसंबंध आहेत (कर्ज मागणाऱ्या कंपनींतील आपले शेअर्स व मॅनेजिंग एजन्सी यांसुद्धा) तें कॉर्पोरेशनच्या डायरेक्टरांनीं स्पष्टपणें उघड केलेच पाहिजेत व अशा कंपनीनें कर्जासाठीं केलेल्या अर्जावर चर्चा होत असतां संबंधित डायरेक्टरानें अशा बैठकीच्या कामकाजांत भाग घेतां कामा नये.

(३) कॉर्पोरेशनचे वार्षिक अहवाल शक्य तितके माहितीपूर्ण असावेत व त्यांत विशेषतः कॉर्पोरेशननें कर्जें दिलेल्या उद्योगधंद्यांत झालेल्या विकासाचा आढावा घेतलेला असावा. तसेंच या अहवालांत कर्जें मंजूर केलेल्या उद्योगधंद्यांचीं नांवें छापण्यांत यावींत.

(४) कर्जें मंजूर करतांना सर्वसाधारणपणें ५० टक्के पर्यंतच्या मार्जिनचें लक्ष्य ठेवावें व कर्ज घेणाऱ्या धंद्याच्या पैसे कमावण्याच्या कार्यशक्तीचें योग्यप्रकारें मूल्यमापन करण्याकडे अधिक लक्ष देण्यांत यावें. सुरक्षिततेची एक बाब म्हणून, अर्जदार धंद्याचे डायरेक्टर व मॅनेजिंग एजंट यांच्या आर्थिक गुंतवणुकीचा कॉर्पोरेशनकडून विचार करण्यांत यावा व कॉर्पोरेशनच्या पूर्वसंमतीवांचून डायरेक्टर आणि मॅ. एजंटस् यांना त्या धंद्यांतील आपापले भाग विकण्याची मुभा असूं नये.

(५) एका अर्जदारास ५० लाख रुपयांहून अधिक रकमेचें कर्ज मंजूर करतांना, कॉर्पोरेशननें सरकारकडे त्याबाबतच्या समग्र माहितीसह कळवावें. कॉर्पोरेशनचा डायरेक्टर, अर्जदार धंद्यांतील मॅनेजिंग डायरेक्टर अगर डायरेक्टर/भागीदार/शेअरहोल्डर असून त्या धंद्यास कर्ज दिल्यास, अशा सर्व प्रकरणांचा अहवाल सरकारकडे पाठविण्यांत यावा. कॉर्पोरेशनचा डायरेक्टर एखाद्या कंपनींत साधा डायरेक्टर अगर शेअरहोल्डर असल्यास, निम्म्याहून कमी डायरेक्टर उपस्थित असलेल्या वा निर्णय एकमतानें न घेतलेल्या बैठकांत कर्जें मंजूर झाल्यास त्या प्रकरणाचा अहवाल सरकारकडे पाठवावा.

उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं कॉर्पोरेशननें दिलेल्या साह्याबाबतचा पंचवार्षिक आढावा तयार करण्यासंबंधीं इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन चौकशीसमितीनें केलेल्या सूचनेकडेहि कॉर्पोरेशनचें लक्ष सरकारनें वेधलें आहे.

## सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि.

(चेअरमन: शि. दा. लिमये, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर: व्ही. वाय. कुलकर्णी, एम. ए., बी. कॉम.)

अहवालाचे वर्षीं सातारा स्वदेशी कमर्शिअल बँकेस शिलकी नफा (१५४७ रु.) धरून ३०,६८८ रु. नफा झाला.

त्याची वांटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली:—

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | रु. ११,००० |
| इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड | रु. २,००० |
| ऑर्डिनरी शेअर्सवर ६% करमाफ व प्रेफरन्स शेअर्सवर ६% आणि ५% वजाकर डिव्हिडंड | रु. १४,३०० |
| बोनस | रु. २,३०० |
| पुढील वर्षांत ओढणें | रु. १,०८८ |
| एकूण | रु. ३०,६,८८ |

**संक्षिप्त ताळेबंद**

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| भांडवल | २,४०,८८० | कॅश व बँकांत | ३,९४,३१७ |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,७३,००० | इन्व्हेस्टमेंट | १८,७९,४९७ |
| ठेवी | ३९,७३,१९८ | कर्जें | २४,३५,४५९ |

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा सिटी

(चेअरमन: शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर: सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., सेक्रेटरी: रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.).

अहवालसालीं गेल्या वर्षाप्रमाणेंच कर्ज व्यवहारांत घट होतीच. परंतु शिल्लक रकमा वरचेवर सरकारी रोखे व डिबेंचर्स मध्यें गुंतविल्या गेल्यामुळें बँकेचे नफ्यावर अहितकारक परिणाम झाला नाहीं. अहवालसालीं बँकेचें हेड-ऑफिस १५-५-५३ पासून "चिरमुले निकेतन" मध्यें नेण्यांत आलें आहे. बँकेनें लोणंद येथें विजयादशमीपासून (१७-१०-५३) नवीन शाखा उघडली आहे. अहवालसालीं बँकेस निव्वळ नफा रु. ४२,६२०-१३-८ झाला असून त्यांत गेले वर्षाचा शिल्लक नफा रु. ३०२-१३-५ मिळविल्यास एकूण नफा रु. ४२,९२३-११-१ चा राहातो. त्याची वांटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली आहे:—

**संक्षिप्त ताळेबंद**

| | | | |
|---|---|---|---|
| भांडवल | ६,५०,००० | कॅश व बँकांत | १०,४१,२७७ |
| रिझर्व्ह, इतर फंड | १,८७,५०० | इन्व्हेस्टमेंटस | ४४,२५,९१७ |
| ठेवी | ७२,६८,२८२ | कर्जें | २८,९०,८९७ |

## "किर्लोस्कर न्यूज"

"किर्लोस्कर न्यूज"चा ५ वा अंक नुकताच हातीं आला आहे. त्यांत किर्लोस्करवाडी, हरिहर, पुणें आणि बंगलोर येथील किर्लोस्कर कारखान्यांच्या प्रगतीचा सचित्र वृत्तांत दिला आहे. त्यावरून हे कारखाने नव्या नव्या यंत्रसामुग्रीची निर्मिति यशस्वी रीत्या करीत आहेत, हें समजून येतें.

## इंपीरिअल बँकेचा शाखा विस्तार

१ जुलै, १९५४ ते ३० जून, १९५७ ह्या तीन वर्षांच्या मुदतींत इंपीरिअल बँकेनें ८० नव्या शाखा उघडण्याचें मान्य केलें आहे. ग्रामीण भागांत बँकिंगचा प्रसार करण्याच्या धोरणास अनुसरून रिझर्व्ह बँक व इंपीरिअल बँक ह्यांचेमध्यें झालेल्या संकेतास अनुसरून ह्या शाखा काढण्यांत आल्या आहेत.

## चहाच्या प्रसारासाठीं प्रचार

भारताच्या सेंट्रल टी बोर्डानें चहाचा प्रसार करण्यासाठीं जोराचा प्रचार चालविला आहे. १९५३–५४ सालीं चहाच्या प्रचारासाठीं बोर्डानें २५,४८,००० रुपये खर्च केले. प्रचाराचे अनेक मार्ग अवलंबिण्यांत आले; चहाचीं दुकानें घालणें, रेल्वेमध्यें चहाच्या विक्रीची व्यवस्था करणें, रेल्वेच्या मार्गावर असणाऱ्या चहाच्या दुकानांची सुधारणा करणें, चहाचीं फिरतीं दुकानें ठेवून लोकांना नमुन्यादाखल चहा पाजणें आणि चहा ह्या पेयाविषयीं चित्रपट दाखविणें, इत्यादि मार्गांनीं प्रचार करण्यांत आला. औद्योगिक कारखान्यांतून ऑक्टोबर १९५३ अखेर १०० चहाचीं दुकानें खोलण्यांत आलीं. मुंबई मेल, मद्रास मेल, खरगपूर–कटक पॅसेंजर, इत्यादि रेल्वे मार्गावर चहाच्या विक्रीची व्यवस्था करण्यांत आली. ग्रामीण भागांत चहाचा खप व्हावा म्हणून अशा भागांत ठिकठिकाणीं चहाचीं केंद्रें उघडण्यांत आलीं. कलकत्ता, कानपूर, मुंबई व मद्रास ह्या चार शहरांतून चहाच्या फिरत्या मोटारी ठेवण्यांत आल्या आहेत. ह्याशिवाय पुरी येथील रथोत्सवाच्या यात्रेंत आणि कल्याणी येथील काँग्रेसच्या अधिवेशनांत चहासंबंधीं प्रदर्शनें भरविण्यांत आलीं होतीं. इंटरनॅशनल टी मार्केट एक्सपान्शन बोर्डांतून भारतानें अंग काढून घेतल्यापासून अमेरिकेंतील चहासंबंधीं प्रचार टी कौन्सिल ह्या संस्थेमार्फत करण्यांत येत आहे. बोर्डानें लंडन येथील कॉरोनेशन प्रदर्शनांत आणि सॅनफ्रॅन्सिस्को येथील औद्योगिक प्रदर्शनांत भाग घेतला होता. त्याशिवाय टोरोंटो येथील औद्योगिक प्रदर्शनांत आणि बर्लिनमधील औद्योगिक प्रदर्शनांतहि चहाचा प्रचार करण्यांत आला. गेल्या वर्षी परदेशीं चहाचा प्रचार करण्यासाठीं ५३,५०,००० रुपये मंजूर करण्यांत आले होते. अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांतून चहाचा प्रसार करणें कितपत शक्य आहे तें पहाण्यासाठीं दोन प्रतिनिधींचें एक मंडळहि बोर्डानें त्या देशांत पाठविलें होतें.

## रशिआची मोटारींची निर्यात

रशिआ आतां मोटारींची निर्यात करूं लागला आहे. दोन वर्षांपूर्वी भारतांत रशिआनें एक औद्योगिक प्रदर्शन मांडलें होतें. पण भारतांत औद्योगिक माल निर्यात करण्याबाबत अद्याप फारशी प्रगति झालेली नाहीं. तथापि स्वीडन आणि नॉर्वे ह्या देशांकडे रशिआ मोटारी निर्यात करूं लागला आहे. रशिआच्या अंकित असलेल्या कम्युनिस्ट राष्ट्रांतून रशिअन मालाला हुकमी बाजारपेठ मिळूं शकते. स्वीडन–नॉर्वेमधील बाजारपेठांची मात्र तशी गोष्ट नाहीं. ह्या बाजारांत रशिअन मालाला पाश्चात्य देशांतील मालाशीं स्पर्धा करावी लागते. गेल्या वर्षी स्वीडिश नागरिकांनीं रशिअन बनावटीच्या ५०० मोटारी विकत घेतल्या. चालू सालीं विक्री १,००० पर्यंत जाण्याचा संभव आहे. फिनलंडमध्येंहि रशिअन मोटारी विकल्या जात आहेत. नॉर्वेनें गोठलेले मासे देऊन त्यांच्या बदला २,००० मोटारी आयात करण्याचे ठरविलें आहे. स्टॉकहोममध्यें भरविण्यांत आलेल्या मोटारींच्या प्रदर्शनांत रशिआनें तीन नमुने ठेवले होते. त्यापैकीं 'मॉस्कोव्हिच' नांवाची गाडी सर्वांत छोटी आहे. युद्धापूर्वी भारतांत छोट्या ओपेल जर्मन गाड्या आल्या होत्या. त्याच धर्तीवर रशिआनें आपली छोटी गाडी बनविली आहे, असें समजतें. गेल्या महायुद्धानंतर नुकसान-भरपाई म्हणून रशिआनें ओपेलचा कारखानाच उचलून रशिआंत नेला आहे.ह्याच कारखान्यांतून रशिआच्या छोट्या गाड्या तयार करण्यांत आल्या आहेत. रशिआची दुसरी गाडी 'पोबेडा' ह्या नांवाची आहे. ही गाडी मॉस्कोमधील रस्त्यावरून टॅक्सी म्हणून धांवताना दिसते. तिची बांधणी बळकट असून ती चांगली ऐसपैसहि आहे. 'झिम' ही तिसरी रशिअन गाडी भली मोठी आणि सुखसोयींनी समृद्ध अशी आहे. कोणत्याहि चांगल्या अमेरिकन मोटारींशी तिची तुलना होऊं शकेल असें म्हणतात. रशिआच्या सरहद्दीवरील पाश्चात्य देशांतूनच सध्या तरी रशिआच्या मोटारींची निर्यात होत आहे.

---

**ब्रिटनसाठीं चंदनाचें तेल**—भारतामधील चंदनाच्या तेलाचा उपयोग करून ब्रिटनमधील साबणाचे कारखाने सुगंधित साबण आणि अत्तरें तयार करतात. एअर-इंडिआ इंटर-नॅशनल वहातूक कंपनीनें १०,००,००० पौंड किंमतीचें तेल ब्रिटिश कारखान्यांना पुरविलें आहे.

**मद्रास राज्यांतील रेडिओ**—१९५४–५५ सालीं ग्रामीण भागांत रेडिओचे कार्यक्रम ऐकले जावे म्हणून मद्रास सरकारनें ६०० नवीन रेडिओ–केंद्रें खोलण्याचें ठरविलें आहे. आतांपर्यंत १७८ केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. ग्रामीण भागांत रेडिओचा प्रसार करण्याच्या योजनेचा हा भाग आहे.

**भारतासाठीं काश्मीरचीं फळें**—काश्मीरमध्यें ३५,००० एकर जमिनींत फळझाडांची लागवड करण्यांत येते. ह्या बागांच्या उत्पादनांतून काश्मीर भारताला दरवर्षी ४,४०,००० मण फळफळावळ पाठवूं शकेल असा अंदाज आहे. युरोपिअन पद्धतीच्या भाजीपाल्याचें बियाणेंहि काश्मीर भारताला पुरवितो. हीं बियाणें सिलोन आणि ब्रह्मदेशालाहि पाठविण्यांत येतात.

**हिंदी भाषांचे शब्दकोष**—रशिअन प्रचारकांनीं भारतीय भाषांचा अभ्यास सुलभ करण्यासाठीं संघटित प्रयत्न चालविले आहेत. भारतामधील उर्दू, हिंदी, तामीळ, बंगाली, तेलगू, गुजराथी आणि मराठी इतक्या भाषांचे शब्दकोष थोडक्या किंमतींत प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत असें समजतें.

**उत्तर प्रदेशांतील तागाची लागवड**—उत्तर प्रदेशांतील ज्या भागांत तागाची लागवड करण्यांत येत आहे त्या भागाची जमिनीच्या दृष्टीनें पाहणी करण्यांत येत आहे. उत्तम प्रकारच्या तागाच्या लागवडीस कोणती जमीन उपयुक्त आहे तें शोधून काढण्याचा पहाणीचा उद्देश आहे. ठिकठिकाणची जमीन आणि त्यांत उगवूं शकणाऱ्या तागाची प्रत ह्यासंबंधींचें संशोधन कलकत्ता येथील तागविषयक संस्थेंत करण्यांत येत असतें.

**जपानी भाषेंत भारतीय अभिजात साहित्य**—भारतीय अभिजात साहित्याचें जपानी भाषेंत भाषांतर करण्याचे प्रयत्न संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शास्त्रीय व सांस्कृतिक शाखेतर्फे करण्यांत येणार आहेत, असें समजतें. जपान, चीन व भारत ह्या पौर्वात्य देशांतील अभिजात साहित्याचें फ्रेंच आणि इंग्लिश भाषांतून भाषांतर करण्याच्या कार्यक्रमाचाच हा भाग आहे. भारत सरकारनें ह्या कामासाठीं १८,००० रुपयांची मदत देण्याचें कबूल केलें आहे.

**अमेरिकन प्रवाशांचा खर्च**—१९५३ सालीं अमेरिकन हौशी प्रवाशांनीं परदेशांत १,३० कोटी डॉलर्स खर्च केले, असा अंदाज करण्यांत आला आहे. युद्धोत्तर काळांत अमेरिकन प्रवाशांनीं परदेशांत जाऊन खर्च केलेल्या रकमेचा आंकडा एकसारखा वाढतच गेलेला दिसतो. १९५३ सालचा खर्चाचा आंकडा १९५२ सालापेक्षा १·५ कोटी डॉलर्सनीं अधिक आहे.

## काजूचा धंदा मंदीच्या तडाख्यांत

त्रावणकोर–कोचीन राज्यांतील काजूचे कारखाने मंदीच्या तडाख्यांत सांपडले असल्यामुळें एका मागून एक बंद पडत आहेत आणि त्यामुळें हजारो मजूर बेकार होत आहेत. परदेशी बाजारपेठांत काजूच्या किंमती घसरल्यामुळें ही आपत्ति ओढविली आहे असें समजतें. ह्या धंद्याची परिस्थिती सुधारण्यासाठीं भारतीय सरकारनें लवकर प्रयत्न करावे अशी विनंति संबंधितांकडून करण्यांत येत आहे. त्रावणकोर–कोचीन राज्यातर्फे लोकसभेंत निवडून आलेल्या कांहीं लोक–प्रतिनिधींनी व्यापारमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी ह्यांना अशी सूचना केली आहे कीं, काजूचा समावेश खुल्या परवान्यांत करण्यांत यावा. असें केल्यानें काजूंच्या निर्यातीच्या मार्गातील अडथळा दूर होईल असें त्यांचें म्हणणें आहे. पण श्री. कृष्णम्माचारी ह्यांना ही सूचना पसंत पडली नसल्याचें समजतें. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें सध्याच्या परिस्थितींत सुद्धां त्रावणकोर-कोचीनमधील कारखानदारांना आफ्रिकेंतून काजू मागवून आणि त्यावर संस्कार करून ते विकता येतील. त्यामुळें खुल्या परवान्याच्या यादींत काजूचा समावेश केल्यानें फारसा फरक पडण्याची शक्यता नाहीं असें त्यांचे म्हणणें आहे. तथापि सरकारनें ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्याचे इतर प्रयत्न चालविले आहेत. काजूच्या निर्यातीसाठीं नव्या बाजारपेठा उपलब्ध करून देणें आणि परदेशांशी होणाऱ्या व्यापारी करारांत काजूंच्या निर्यातीची शक्य तितकी व्यवस्था करणें ह्या दोन दिशांनीं सरकारचे प्रयत्न चालू आहेत. भारत सरकारनें प. जर्मनी, झेकोस्लोव्हाकिआ आणि हॉलंड ह्या राष्ट्रांशीं जे व्यापारी करार केले आहेत त्या करारांतून काजूच्या निर्यातीची व्यवस्था करण्यांत आली आहे. ह्या प्रयत्नांशिवाय आणखी कांहीं मार्ग निघण्यासारखे असल्यास त्रावणकोर-कोचीनच्या सरकारनें ते सुचवावे अशी विनंतीहि करण्यांत आली आहे. ह्या सर्व प्रयत्नांना यश येऊन काजूचे कारखाने पुन्हां पूर्ववत् चालू लागतील, असें वाटतें.

---

## रशिआचा अमेरिकेंतील व्यापार

अमेरिकेंत व्यापार करण्यासाठीं म्हणून रशिआनें ॲमटॉर्ग ट्रेडिंग कॉर्पोरेशन नांवाची संस्था स्थापन केली होती. गेलीं पांच वर्षे बंद असलेली ही संस्था पुन्हा चालू करण्यांत आली असून त्यामुळें बरेच तर्ककुतर्क करण्यांत येत आहेत. ही एक व्यापारी संस्था असून ती खरेदी–विक्रीचें कार्य करते. संस्था अमेरिकेंत रजिस्टर करण्यांत आलेली असून तिची मुख्य कचेरी न्यूयॉर्क येथें आहे. संस्थेच्या कार्यास पुन्हा प्रारंभ झाल्यापासून तिजकडून अमेरिकन व्यापारी आणि उद्योगपती ह्यांच्याकडे नाना प्रकारच्या मालासंबंधीं विचारणा करण्यांत येत आहे. यांत्रिक हत्यारें, बांधकामाची यंत्रसामुग्री, खाणीची यंत्रसामुग्री, शेतीची अवजारें, कातड्याच्या व कापडाच्या गिरण्यांची यंत्रें, इत्यादि विविध प्रकारचा माल पुरविण्याविषयीं संस्थेनें चौकशी चालविली आहे. पण, ह्यापैकीं बहुतेक माल रशिआला निर्यात करण्यास अमेरिकन सरकारनें बंदी घातलेली आहे. त्यामुळें बहुतेक सर्व मागण्या अमेरिकन कारखानदारांनीं अमेरिकेच्या परदेशीय व्यापार खात्याकडे पाठविल्या आहेत. निर्यातीस बंदी असलेल्या मालाच्या यादींत कांहीं फेरफार होण्याचा संभव असल्यानें रशिआकडून आगाऊ चौकशी करण्यांत येत असावी असा अंदाज करण्यांत येत आहे. सध्या अमेरिका व पूर्व युरोपांतील देश ह्यांचा व्यापार अगदींच अल्प आहे, तथापि १९३० सालांत ह्याच संस्थेनें अमेरिकेकडून ३० कोटी डॉलर्सचा माल रशिआसाठी विकत घेतला होता. त्यावेळीं अमेरिकेंत आर्थिक अरिष्ट ओढविलें असल्यानें अमेरिकन उद्योगपतींनीं वरील प्रकारचा माल मोठ्या आनंदानें पुरविला. १९४७ सालीं म्हणजे शीतयुद्ध सुरू होण्यापूर्वी ह्या संस्थेनें अमेरिकेकडून १८ कोटी डॉलर्सचा माल विकत घेतला होता.

---

## ब्रिटनमधील भारतीय प्रदर्शन

चालू महिन्यांत लंडन येथें ब्रिटिश औद्योगिक प्रदर्शन भरणार आहे. ह्या प्रदर्शनांत भारतासह कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील राष्ट्रें भाग घेणार आहेत. तथापि भारताचा प्रदर्शनांतील विभाग सर्वांत मोठा आहे असें समजतें. प्रदर्शनांत भारतांमधील अवजड यंत्रसामुग्री ठेवण्यांत येणार होती. परंतु आतां ती ठेवण्यांत येणार नाहीं असें कळतें. असें असलें तरी भारतांत तयार होणाऱ्या कच्च्या मालाची आणि भारतीय उद्योगधंद्यांची चांगली कल्पना प्रदर्शनावरून करतां येईल इतक्या उच्च दर्जाचे तें असेल. केवळ हातानें वापरण्यासारख्या हत्यारांचा एक भाग प्रदर्शनांत ठेवण्यांत येणार आहे. हा भाग म्हणजे एक अपूर्वाईची बाब होईल. भारतांत परदेशीय प्रवासी आले तर भारताला परकीय हुंडणावळीची प्राप्ती होते. तेव्हां अधिक प्रवाशांना भारताला भेट देण्यासाठीं उद्युक्त करावें म्हणून एक प्रवासी–विभाग प्रदर्शनांत उघडण्यांत येणार आहे. मॅंगेनीझ आणि इतर खनिजें, चहा, ताग, लाख, कातडी, खेळाचें सामान, इत्यादि विविध प्रकारचा माल प्रदर्शनांत पाहण्यास मिळेल. त्याशिवाय रबरी व लिनोलिअमचा मालहि ठेवण्यांत येणार आहे. भारतीय गिरण्यांत तयार झालेलें कापड आणि ग्रामोद्योगांत तयार झालेल्या वस्तू ह्यांकडे विशेष लक्ष देण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. ह्या प्रदर्शनांत भाग घेण्यासाठी भारताला बराच खर्च साहजिकच येणार आहे. परंतु भारतीय मालाचें प्रदर्शन व जाहिरात जगभर करण्याची एक फार मोठी मोक्याची संधि त्यामुळें मिळणार आहे. भारतामधील कच्च्या मालाची राष्ट्रकुलांतील राज्यांना कल्पना येण्यासाठींहि ह्या प्रदर्शनाचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे. अर्थातच, होऊं घातलेला खर्च सत्कारणीं लागेल ह्यांत शंका नाहीं.

---

**राजेरजवाड्यांची मदत**—सौराष्ट्रांतील राजेरजवाड्यांनीं स्वतःला मिळणाऱ्या तनख्यापैकीं २५ टक्के तनखा भारत सरकारच्या राष्ट्रीय विकास कर्जांत गुंतविण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. सौराष्ट्राचे मुख्य मंत्रि आणि राजप्रमुख ह्यांनीं विनंती केल्यावरून हा निर्णय घेण्यांत आला आहे.

**नॉर्वेजिअन सरकारची दक्षता**—नॉर्वेचें सरकार एक कायदा करून ७ वर्षांखालील मुलांना सिनेमाला नेण्यास बंदी करण्याचा विचार करीत आहे. मुलांना दाखविण्यास योग्य अशा चित्रपटांची वर्गवारी करण्यांत येणार आहे. कांहीं चित्रपट ७ वर्षांवरील मुलांसाठीं आणि कांहीं १२ वर्षांवरील मुलांसाठीं, असें वर्गीकरण करण्यांत येईल.

**इस्पितळाची वाढ**—उत्तर प्रदेशांतील सरोजिनी नायडू इस्पितळांत २० झोपडीवजा लहान वार्डस नव्यानें बांधण्यांत येणार आहेत. उत्तर प्रदेश राज्यांतील हें दुसऱ्या क्रमांकाचें इस्पितळ आहे. नवीन इमारतींसाठीं ८७,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. त्याशिवाय इस्पितळाला मदत म्हणून आणखी १ लाख रुपये देण्यांत येणार आहेत.

### भारतांतील सहकारी चळवळीची प्रगति

| वर्ष | सोसायट्यांची संख्या ( हजार ) | प्राथमिक सोसायट्यांचे सभासद (लक्ष) | खेळतें भांडवल ( कोटी रु. ) |
|---|---|---|---|
| १९०६–१० | १.९३ | १.६२ | ०.६८ |
| १९११–१५ | ११.७९ | ५.४८ | ५.४८ |
| १९१६–२० | २८.४८ | ११.२९ | १५.१८ |
| १९२१–२५ | ५७.७१ | २१.५५ | ३६.३६ |
| १९२६–३० | ९३.९४ | ३६.८९ | ७४.८९ |
| १९३१–३५ | १०५.७१ | ४३.२२ | ९४.६१ |
| १९३६–४० | ११६.९६ | ५०.७७ | १०४.६८ |
| १९४१–४५ | १४९.८९ | ७२.१८ | १२४.३५ |
| १९४६–५० | १५९.६१ | १०७.२८ | १८८.७३ |
| १९५०-५१ | १८१.१८ | १३७.१५ | २७५.८५ |

### ग्रेट ब्रिटनमधील सायन्स लायब्ररी

ग्रेट ब्रिटनमधील सायन्स म्यूझियमची एक शाखा म्हणून चालविण्यांत येणारी सायन्स लायब्ररी हें शुद्ध व व्यावहारिक शास्त्रविषयक ग्रंथांचें केंद्रस्थान आहे. १८४३ सालीं सर हेन्री डिला बेच ह्यांनीं आपल्या जवळील शास्त्रीय ग्रंथांचा संग्रह राष्ट्रास भेट म्हणून दिला, त्यांतून ह्या लायब्ररीचा उगम झाला. आतां ह्या ग्रंथालयांत ३,६०,००० ग्रंथ आहेत. शास्त्रीय विषयावरील नियतकालिकें, हें ह्या ग्रंथालयाचें वैशिष्ट्य सांगतां येईल. अशा नियतकालिकांचीं १८,००० बांधीव पुस्तकें आहेत व त्यांत दरसाल ६०० ची भर पडत असते. कोणाहि इच्छुकाला लायब्ररींत प्रवेश मिळूं शकतो; अर्ज करून प्रवेशपत्रिका मात्र घ्यावी लागते.

### भाषांचा प्रश्न

चिनी, इंग्रजी, हिंदी–उर्दू, रशियन, स्पॅनिश, जर्मन, जपानी, फ्रेंच, मलायी, बंगाली, पोर्तुगीज, इटालिअन आणि अरेबिक ह्या जगांतील प्रमुख भाषा आहेत. पहिल्या महायुद्धानंतर स्लोव्हीन, स्लोव्हाक, चेक, लिथ्वेनिअन, लेटिश, एस्टोनिअन, व्हाइट रशिअन आणि युक्रेनिअन ह्यांना राष्ट्रीय किंवा प्रादेशिक दर्जा प्राप्त झाला व शाळांतून त्या अधिकृत रीत्या शिकविल्या जाऊं लागल्या. फिलिपाइन्स, बर्मा, पाकिस्तान, भारत, सिलोन, इंडोनेशिया आणि इस्राएल ह्या सर्व नव्या राष्ट्रांनीं नव्या राष्ट्रभाषा पत्करल्या असून त्यांच्या शिक्षणाचे प्रश्न हे भाषाविषयक प्रश्न बनले आहेत. शाळेंत शिकून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या भाषेखेरीज किमान एक तरी दुसरी भाषा आली पाहिजे, असें “ युनेस्को ” च्या पहाणींत म्हटलें आहे.

### दैनिकांचा खप

दर हजार नागरिकांस किती प्रती ?

| | |
|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ६१५ |
| स्वीडन | ४९० |
| ऑस्ट्रेलिया | ४१६ |
| अमेरिका | ३५३ |
| भारत | ८ |
| पाकिस्तान | २ |
| अफगाणिस्तान | १ |


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८१

मोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ८२,२०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,०८,००,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५३ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.